संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८९८/२०२६
निशाणी क्र.४

MHTH250084462026

## वसई येथील ४ थे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई यांचे न्यायालयात
## (पिठासिन अधिकारी – एन.यु. मसुरकर)

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | :– | १८/०७/२०२६ |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | :– | १८/०७/२०२६ |
| ३. फिर्यादिदाराचे नाव | :– | नागेश आनंद हांजगे, पो.अं./०७३४४ |
| ४. आरोपीचे नाव | :– | **रविचंद्रन राजअंगम,**<br>वय : ३१ वर्षे, व्यवसाय : चालक,<br>रा. : तळमजला शिवपार्वती अपार्टमेंट गावठाण रोड, विरार पश्चिम, ता.वसई, जि. पालघर. |
| ५. गुन्हयाचे विवरण | :– | खालीलप्रमाणे. |

दिनांक १८/०७/२०२६ रोजी १३.०० वाजताचे सुमारास तुमच्या ताब्यातील छोटा हत्ती वाहन क्रमांक एम.एच. – ४८ टी. ०६९९ हा ओलांडा नाका जवळ, विरार आगाशी रोडवर, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर येथे मुख्य रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल अशा पार्क केलेल्या स्थितीत मिळून आला म्हणून अर्नाळा सागरी कार्यक्षेत्रात भारतीय न्याय संहीतेचे २८५ प्रमाणे दंडनीय गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

14/8/26

(एन.यु. मसुरकर)
४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई.

वसई
दिनांक १४/०८/२०२६

प्रश्नः– तुम्हाला पोलीस दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या का?

उत्तरः– होय.

प्रश्नः– तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचून दाखवला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तरः– होय.

Scanned with OKEN Scanner

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८९८/२०२६
निशाणी क्र.४

प्रश्नः- तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः- होय.

आरोपीची सही R. Ravichandran

आरोपीने गुन्हयाचा तपशील त्याच्या मातृभाषेत वाचून, समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल केला आहे.

14/8/26

(एन.यु. मसुरकर)

वसई

दिनांक १४/०८/२०२६

४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई.

## न्यायनिर्णय

**(दिनांक १४/०८/२०२६)**

सदर आरोपीविरुध्द भा. न्या. संहीता २८५ प्रमाणे खालील आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपीने त्यांचे वकीलांचे उपस्थितीत स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे. त्यानंतर आरोपीला बोलावून गुन्हा कबूल केल्यामुळे होणा-या परिणामांची माहिती दिली. त्या परिस्थितीत सुध्दा आरोपी हा गुन्हा कबूल करत आहे. त्यामुळे सदरील कबुली ही स्वखुशीने केली असल्याचे निदर्शनास येते. वरील प्राप्त परिस्थिती लक्षात घेतली असता सरकार पक्षाचे फिर्यादीमधील कथन निर्विवादपणे सिध्द झालेले आहे. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यामुळे आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे खालील शिक्षा न्याय होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो :-

## आदेश

१. आरोपी **रविचंद्रन राजअंगम** यांना गुन्हा रजिस्टर क्रमांक १३०/२०२६ मधील अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय न्याय संहिताचे कलम २८५ प्रमाणे चे गुन्हयाकरिता दोषी धरुन सदर गुन्हयाबद्दल आरोपीला रक्कम रुपये **२,०००/-** (**अक्षरी दोन हजार रुपये मात्र**) दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीला **१ दिवस** साध्या कैदेची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला मोफत देण्यात येत आहे.

14/8/26

(एन.यु. मसुरकर)

वसई

दिनांक १४/०८/२०२६

४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई.

R.No. 1338/26
Received Cash ~~Security~~ / ~~Cost~~ /
~~Maintenance~~ / Fine / ~~Penalt~~
Rs. 2000/- (दोन हजार फक्त)
14/08/2026
S... (...ence)
Jt. ... D. Vasai